नि.दि.दा.क्र.९२/२०२१
आत्माराम वि. प्रेमा वगैरे

**अर्ज निशाणी ३६ खालील आदेश**

**(CNR MHSI080010922021)**

०१. प्रस्तूतच्या अर्जान्वये वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.०७ चंपु आप्पा विश्वासराव यांच्या वारसांना दाव्याच्या अभिलेखावर घेण्यास विनंती केलेली आहे. त्यांनी पुढे असे नमुद केले आहे की, प्रतिवादी क्र.०७ हे दि.२०/०५/२०२२ रोजी मयत झाले आहेत. सबब, प्रस्तूत वादी यांनी प्रतिवादी क्र.०७ चे वारस अभिलेखावर घेण्याची विनंती केली आहे.

०२. प्रतिवादी क्र.०८ ते १२अ यांनी सदर अर्जावर आपले म्हणणे दाखल करुन हरकत घेतली आहे.

०३. प्रस्तूत दावा वादीने वाटपाकरीता दाखल केला आहे. प्रस्तूत प्रतिवादी क्र.०७ चे वारस हे प्रस्तूत दाव्यास आवश्यक पक्षकार आहेत. अर्जात नमूद कारण योग्य वाटते. सबब, वरील कारणमिमांसेचा सारांश असा की, प्रस्तूत अर्ज मंजूर करणे योग्य वाटते. करीता, खालील प्रमाणे आदेश पारित करत आहेः

– **आदेश –**

०१. निशाणी क्र.३६ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

०२. वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.०७ यांच्या वारसांना प्रतिवादी क्र.०७ चे वारस म्हणून अभिलेखावर समाविष्ट करुन घ्यावे.

SHUBHAM GOVIND LATURIYA
Digitally signed by SHUBHAM GOVIND LATURIYA
Date: 2025.08.14 10:50:18 +0530

स्थळ : कणकवली
दिनांक : १३/०८/२०२५

(शुभम जी. लटुरिया)
न्यायाधिकारी, ग्रामन्यायालय,
वैभववाडी.